Review of Research
International Online Multidisciplinary Journal
ISSN : 2249-894X Impact Factor 3.1402 (UIF) Volume -5 | Issue - 6 | March - 2016

# महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित पुणे यांचे शिक्षण प्रशिक्षणांत प्रचार प्रसिद्धीत महाराष्ट्र राज्यातील योगदानाचा अभ्यास




कु. सरस्वती हेमराजसिंह बिनवार[१] , डॉ. अरविंद शेंडे[२]
[१]संशोधनकर्ती , एम.कॉम.एम.ए.एम.फिल.बि.एड्. , जी.डी.सी. ॲन्ड ए.
[२]मार्गदर्शक , प्राचार्य , कमला नेहरु महाविद्यालय सक्करदरा चौक, नागपूर.

## साराशं
ग्रामीण व शहरी भागातील जनतेच्या कोणत्या प्रकारच्या गरजा सहकारी पतसंस्थामार्फत पूर्ण करता येतील याबाबत विचार करून सहकारी संस्थांचे कार्यक्षेत्र आणि व्याप्ती ठरविण्यात आली. सहकारी संस्थांनी सर्वसाधारणपणे सभासदांच्या बहुउद्देशीय गरजा भागविण्याचे काम करावे. प्रस्तुत अध्ययनाचे शिर्षक महाराष्ट्र राज्य सहकारी संघ पुणे संस्था यांचे शिक्षण, प्रशिक्षणात पुणे जिल्हयातील योगदान हा असून सहकारी प्रबंध संस्थान मध्ये नागपूर जिल्हयाच्या योगदानाचा अभ्यास करण्याच्या उद्देशाने या विषयाची निवड करण्यात आली आहे.

## प्रस्तावना
‘‘जर तुम्हा सर्वांचे उद्देश सारखे असतील जर तुम्हा सर्वांचे हृदय एक झालेले असतील तर तुम्हा सर्वांचे मन एक झालेले असतील तरच तुम्ही आर्थिक कार्यक्षमतेने कार्य करू शकाल’’

वरील वाक्य ॠग्वेदातील असून सहकार ही सहजप्रवृत्ती माणसाला प्रगती करून घेण्यासाठी एकत्र काम करण्याची प्रेरणा देते. सहकारी प्रवृत्तीतून प्रगतीची प्रेरणा मिळते. प्लुटो यांनी म्हटल्याप्रमाणे सहकाराशिवाय मानवी विकास अशक्य आहे. सहकार्य सामाजिक कल्याणार्थ निस्वार्थ भुमिकेतून एकत्र येऊन काम करण्याचे घेतलेले व्रत होय. मानवजाती ची सेवा करण्याचा एक परोपकारी मार्ग म्हणजे सहकार होय, तेथे कोणत्याही प्रकारे हेवेदावे द्वेष, मत्सर, स्पर्धा इत्यादींना वाव नसतो. आणि योग्य व विधायक कार्य करण्यासाठी सहकाराची कास धरल्याशिवाय जीवनात आनंद उत्साह व परस्परांविषयी श्रद्धा निर्माण होऊ शकत नाही.

सहकार शक्ती जीवनशास्त्रीय दृष्टया अत्यंत महत्वाची आहे. असा जीवशास्त्रांचा विश्वास आहे. तसेच विज्ञानाने सिद्ध केले आहे की, मानव जातीचे अस्तित्व व सौख्य हे प्रेम आणि सहकार्य यामधूनच निर्माण होते. यावरून असे प्रतिबिंबीत होणारी

एकात्मक समाज व्यवस्था एका शब्दांत व्यक्त करायची असल्यास तो शब्द म्हणजे सहकार होय. श्रीमती इंदिरा गांधी यांच्या शब्दात मी कोणतेही साधन ओळखत नाही. जे की. इतके शक्तीशाली आणि सामाजिक ध्येयाने तितकेच पूर्ण आहेत, जितके की सहकार आंदोलन आहे. अशा महत्वपूर्ण विषयी ऐतिहासिक पार्श्वभूमी इतिहास व त्यांचा उगम पाहणे आवश्यक आहे.

इंग्लंडमध्ये झालेल्या औद्योगिक क्रांतीतून निर्माण झालेल्या भांडवलशाही अर्थव्यवस्थेला पर्याय म्हणून सहकारी चळवळीचा उदय झाला असे मानले जात असले तरी मानवी सहकारी प्रवृत्ती ही प्रचीन मूलभूत प्रकारची आहे.असे म्हणता येईल. ''जॉन स्टुअर्ट'' या जगप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञाने ''आपल्या प्रिन्सीपल्स ऑफ पोल्टीकल इॅकॉनॉमी'' या ग्रंथात म्हटल्याप्रमाणे ''सहकार हे उन्नत उद्दिष्ट आहे.'' परस्परविरोधी हितासाठी झगडणाऱ्या वर्गातील संघर्ष दूर करुन सर्वांच्या कल्याणासाठी स्नेहपूर्ण स्पर्धेची कास भरुन मानवी जीवनाला योग्य पुरस्कार देण्याच्या सहकार प्रयत्न करतो. ''जे जे आपणाशी ठावे ते ते दुसऱ्यांना शिकवावे'' शहाणे करुन सोडावे सकळ जन तुकाराम महाराजांनी सांगितलेल्या उक्तीप्रमाणे सहकार चळवळ प्रयत्न करीत आहे. आज या चळवळीला वटवृक्षांचे स्वरुप येत आहे.

भारतातील कौटीलीय अर्थशास्त्रीय सहकाराचे वर्जन असणारे अनेक मत मांडलेले आहेत. थोडक्यात प्राचिन तत्वज्ञ ते आधुनिक अर्थशास्त्रज्ञ समाजशास्त्रज्ञ यांच्या ग्रंथातून सहकार विषयांच्या योग्य व अनुकूल विचारांचे दर्शन होते.

मानवाच्या दैनंदिन जीवनात संघर्षाइतकाच किंवा त्यापेक्षा अधिक सहकाराचा परिस्थितीजन्य गरजेपोटी तीव्रतेने प्रत्यय येतो.

भारतीय सहकारी आंदोलनाचा अभ्यास मनोरंजनात्मक व प्रशंसनीय आहे. जेव्हा स्वाधीनता एक लक्ष होते. जेव्हा देशांत लोकतंत्र थोडया स्वरुपात दिसून येत होते. आणि सर्व प्रकारचे शोषण ही वेळेची व्यवस्था होती परंतु राष्ट्रीय स्वाधीनता प्राप्ती करीता लगेच यांनी आपले स्थान प्राप्त करुन घेतले. आज या शताब्दी यांनी देशाला जखडून ठेवण्याची श्रृंखला सोडून फेकण्याचे संकल्पाचे प्रतिक आहे. यात काही आश्चर्य नाही की सहकारीता ला आयोजित आर्थिक विकास व लोकतंत्र आणि समाजवादाचे पोशित लक्षाची उपलब्धी संबंधी देशाला एक आव्हानात्मक भूमिका दिलेली आहे. भारतात सहकारी आंदोलनाचे भविष्य उज्जवल आहे. समोर येणाऱ्या आवश्यक कर्तव्याचे महत्व प्रकाशित करता येईल. आज आपल्या देशात सहकारी आंदोलनाबाबत जास्तीत जास्त प्रमाणात अनेक लेखकांनी आपले लेख प्रस्तुत केले आहे. आणि अजून प्रस्तूत केले जाणार आहे. हे भारतात लोकांच्या समाजार्थिक (Socioeconomic) लोकांची आंदोलनाच्या समोर प्रस्तुत आव्हान आणि कार्याचे स्वरुप विभिन्न क्षेत्राशी संबंधित आहे.

## महाराष्ट्रातील सहकारी शिक्षण विषयक व्यवस्था :-

या व्यवस्थेला नेतृत्व विकास कार्यक्रम अथवा सभासद शिक्षण योजना असे संक्षेपाने म्हटले जाते. सहकारी चळवळीत सहभागी झालेल्या सभासदांना आपल्या संस्थांच्या नेतृत्वाची धुरा कधीना कधी उचलावी लागते. सहकारी संस्था ही आर्थिक व्यवहार करणारी संघटना असल्यामुळे तिच्यामधे सहभागी झालेल्या अशा सर्व सभासदांना सहकारी संस्थांच्या कार्यपद्धती विषयी माहिती असणे आवश्यक ठरते. हेच सभासद आज ना उद्या सहकारी चळवळीचे नेतृत्व करणार असल्यामूळे त्यांना सहकारी चळवळीची माहिती देणे म्हणजेच नेतृत्व विकास होय. या सर्व बाबींची पुर्तता करण्यासाठी राज्य सहकारी संघ पुढीलप्रमाणे विविध कार्यक्रम पार पाडीत असतो. या सर्व कार्यक्रमामध्ये महिला आणि पुरुष सहभागी होत असतात.

## शैक्षणिक कार्यक्रमाचे आयोजन :-

राज्य सहकारी संघाची सलंग्न कार्यालये म्हणुन सर्व जिल्हा सहकारी मंडळे सहकारी शिक्षणाचे कार्यक्रम आपापल्या जिल्हयात राबवित असतात. त्याकरीता राज्य सहकारी संघाने प्रत्येक जिल्हा सहकारी मंडळापुढे कार्यालये प्रमुंख म्हणुन एक सभासद सचिव आणि जिल्हयातील सहकारी प्रशिक्षण निर्देशक या हुद्याचे अधिकारी मंडळाकडे नेमलेले असतात. त्यांच्या मार्फत जिल्हा सहकारी मंडळे पंचायत समिती वर्ग (२ दिवस) पुरुष व महिलांचे एक दिवस मुदतीचे सहकारी मेळावे महाविद्यालयीन युवक युवतीसाठी सहकारी शिबीरे (२ दिवस), युवक आणि युवती मेळावे १ दिवस, निबंध स्पर्धा (हायस्कुल) कॉलेज मधील विद्यार्थी व विद्यार्थीनी करीता अल्प मुदत वर्ग पदाधिकारी वर्ग सचिव कार्यशाळा, शैक्षणिक सहल, जिल्हा स्तरीय वक्तृत्व स्पर्धा, राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा संस्थांच्या स्थिती अभ्यास यासारखे सहकारी स्थिती अभ्यास यासारखे सहकारी शिक्षणविषयक कार्यक्रम राबविली जातात. विसाव्या शतकाच्या अखेर एकविसाव्या शतकाची पहाट होत असतानांच सातत्याने समाजामध्ये होत जाणारे बदल आधुनिक दृष्टीकोन याचाही विचार कार्यक्रमाची आखणी करीत असतांना केला जातो.

सहकारी प्रचाराच्या आर्थिक दृष्टीने जिल्हा सहकारी मंडळे, जिल्हा पातळीवर विविध प्रकारच्या सहकारी संस्थांसाठी परिसंवाद आयोजन करता जिल्हा सहकारी कार्यकर्त्यांच्या परिषदेचे आयोजन करुन जिल्हयातील सहकारी प्रगतीच्या आढावा घेवून समस्या सोडविण्यासाठी विचार मंथन परिषदेत केले जाते व प्रश्न आणि समस्या सोडविण्यासाठी उपाय ठरावाद्वारे शासनाच्या संबंधित खात्यास आणि वरिष्ठ पातळीवर सहकारी संस्थांना सादर केले जातात. जिल्हा सहकारी मंडळे जिल्हयातील सहकारी

चळवळीचे प्रवक्ते म्हणुन भुमिका बजावित असतात. काही जिल्हा सहकारी मंडळे त्यांच्या आर्थिक परिस्थितीस अनुसरुन सहकारावर पाक्षिके अगर मासिके प्रसिद्ध करीत असतात. जिल्हा सहकारी मंडळामार्फत पाडावयाच्या शैक्षणिक कार्यक्रमाची माहिती पुढील प्रमाणे आहे.

### शैक्षणिक कार्यक्रम :-

महाराष्ट्र राज्य सहकारी संघाद्वारे प्रत्येक जिल्हा सहकारी बोर्डात नवीन वर्षे सुरु होण्यापुर्वी शैक्षणिक कार्यक्रमाचे उद्दिष्टे दिले जाते. १ एप्रिल ते ३१ मार्च हे सहकारी वर्ष मानले गेले असून या वर्षी पार पाडावयाच्या शैक्षणिक कार्यक्रमाची आखणी केली जाते व त्याप्रमाणे सर्व शैक्षणिक कार्यक्रम पूर्ण करणे अपेक्षित असते. मंडळाकडे असणाऱ्या सहकार प्रशिक्षण निर्देशकामध्ये या कार्यक्रमाची समप्रमाणात विभागणी केली जाते त्याप्रमाणे प्रत्येक सहकार प्रशिक्षण निर्देशकाचा प्रत्येक महिन्याचा संभाव्य शैक्षणिक कार्यक्रम तयार केला जातो.

### महाराष्ट्र राज्य सहकारी प्रबंध संस्था पुणे द्वारे शिक्षण, प्रशिक्षण व माहितीचा प्रचार प्रसिद्धीः-

आपल्या संस्थेच्याा प्रगती आणि विकासासाठी संस्थेच्या सभासदांना आपल्या संस्थेतील निवडून आलेल्या सर्व प्रतिनिधींना गरजाधिष्ठीत सहकारी शिक्षण तर , संस्थेच्या अधिकारी, सेवकांना कार्यानुरुप सहकारी प्रशिक्षण हे एक व्यक्तिभूत असलेल्या सहकारी संस्थांचे 'श्वासोच्छवास' प्रमाणे एक 'जीवनसत्व' आहे प्रबंध सहकारी संस्थांनी बहुजन समाज आणि जनमत यांचेसाठी ही सहकाराची वैशिष्टये, मुल्ये, तत्वे कार्यपद्धती व सहकाराचो फायदे इत्यादी विषयी सतत माहिती प्रसारित केली जाते. शिस्त कार्यक्षमता व संस्थेची सातत्यपूर्ण प्रगती आणि विकास यासाठी आवश्यक असलेले व्यवसायिक व्यवस्थापन यशस्वीपणे अंगीकारणे शक्य व्हावे म्हणूनही सातत्यपूर्ण सहकारी शिक्षण - प्रशिक्षण, संशोधन आणि माहितीचे प्रसारण यांची प्रत्येक सहकारी संस्थेत नितांत आवश्यकता असते. हि आवश्यकता पूर्ण करण्याचे, शिक्षण - प्रशिक्षणाच्या माहितीचे प्रचारप्रसार करण्याचे कार्य प्रबंध सहकारी संस्थेने पुर्ण केले आहे.

महाराष्ट्र राज्य सहकारी संघात येणारे कर्मचारी अधिकारी व पदाधिकारी यांना प्रशिक्षण देण्याचे कार्य प्रबंध संस्था करीत असते. प्रशिक्षण देण्याचे कार्य प्रबंध संस्था करीत असते. प्रशिक्षणार्थीचा शिक्षण खर्च प्रबंध संस्थेला म.रा. सहकारी संघ पुणे द्वारे येत असतो. महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचा उद्देश म्हणजे उत्कृष्ट कर्मचारी, अधिकारी व पदाधिकारी निर्माण करणे असतो. सहकारी चळवळीचे यश मुख्यत्वे ज्याप्रमाणे कार्यकर्त्यांच्या व सेवकवर्गाच्या कार्यक्षमतेवर अवलंबून असते, नोकरवर्गाच्या सहकारी चळवळीविषयक ज्ञानावर अवलंबून असते, नोकरवर्गाच्या सहकारी चळवळीविषयक ज्ञानावर अवलंबून असते त्याचप्रमाणे सभासद पदाधिकारी व अधिकाऱ्यांवर देखील असते.

### निष्कर्ष

महाराष्ट्र राज्य सहकारी संघ पूणे संस्थानने पुरविलेल्या शिक्षणाने सभासदांची, कर्मचाऱ्यांची तसेच संबंधित घटकांची जबाबदारीने वागण्याची कार्यक्षमता वाढली आहे. सहकारसंबंधीचे शिक्षण व प्रशिक्षणाने व्यवहार सुलभतेने तत्परतेने पार पाडणे, व्यवसायिक प्रथा पाळणे सहकारी तत्वांची व नियमांची पायमल्ली न करणे, ध्येय धोरणानुसार सर्व कामकाज चालविणे, सहकारी निर्धीचा वापर संस्थेच्या हितासाठीच करणे, मालमत्तेचा गैरवापर टाळणे, इत्यादी बाबतीत सर्वच घटकात जबाबदारीची भावना निर्माण होते.

### संदर्भग्रंथ सुची


| अ.क्र. | पुस्तकाचे नांव | लेखक |
|---|---|---|
| १. | मराठी विश्वकोश | महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती महामंडळ |
| २. | सामाजिक संशोधन पद्धती | डॉ. पु.ल. भांडारकर<br>दत्त प्रकाशन, सदर नागपूर |
| ३. | समाज शास्त्रीय संशोधन तत्व आणि पद्धती | प्रा.रा.ना घाटोळे |
| ४. | हरविलेले नागपूर | सुरेश भुसारी<br>ज्ञानेश प्रकाशन, नागपूर |
| ५. | महाराष्ट्र १९९० | संतोष दास्ताने<br>रामदासपेठ, नागपूर |
| ६. | आपण नागपूर जिल्हा | महाराष्ट्र पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ |

| | | |
|---|---|---|
| | | २००१ |
| ७. | सहकाराची मूलतत्वे | मा.वि. मदाने |